01-07-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/30/2025 10:15 PM Page 1



# शाळेजवळील कचराकुंडीमुळे मडगावमध्ये संताप

## पालक आणि रहिवाशांची तातडीच्या कारवाईची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३० :** मडगाव येथील लोयोला हायस्कूल आणि फातिमा हायस्कूलजवळ साचलेल्या बेवारस ओल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पालक, स्थानिक रहिवासी आणि शालेय समुदायाकडून मडगाव नगर परिषदेकडे तातडीच्या स्वच्छता उपाययोजनांची मागणी करण्यात येत आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून संबंधित कचराकुंडी न साफ केल्यामुळे तेथील कचरा कुजून दुर्गंधी पसरत आहे. दोन प्रमुख शाळांच्या प्रवेशद्वारापासून अगदी काही पावलांवर ही कचराकुंडी असल्याने, दररोज शेकडो विद्यार्थी आणि पालकांना या घाणीतून मार्ग काढावा लागत आहे. परिणामी, परिसरात स्वच्छतेचा अभाव आणि संभाव्य आरोग्य धोक्यांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

लोयोला हायस्कूलमधील विद्यार्थ्याच्या पालक रियाना शेख यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत म्हटले की दररोज सकाळी मुलांना घेऊन या घाणीतून जावे लागते. दुर्गंधी इतकी असह्य झाली आहे की कोणीही कधीही आजारी पडू शकतो. प्रशासनाने हा कचरा तत्काळ हटवावा.

फातिमा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांच्या एका पालक फ्रान्सिस फर्नांडिस यांनी म्हटले, शाळेसमोर अशी अवस्था असणे हे अपमानास्पद आहे. अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. आमच्या मुलांना स्वच्छ, सुरक्षित वातावरण मिळाले पाहिजे. आम्ही त्वरित कारवाईची मागणी करतो.

या कचराकुंडीच्या ठिकाणी उघड्यावर कुजणारा कचरा, डासांचा त्रास, तसेच दुर्गंधीमुळे परिसरात जंतुसंसर्ग व संसर्गजन्य आजार पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. विद्यार्थ्यांना शाळेत येताना आणि जाताना या अस्वच्छतेचा सामना करावा लागत असल्याने त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य दोन्ही धोक्यात आले आहे.

शहरातील स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, स्थानिक नागरिकांनी मडगाव पालिकेच्या कार्यपद्धतीवर तीव्र टीका केली आहे. रहिवाशांनी असेही सुचवले की, शाळांसारख्या संवेदनशील ठिकाणांजवळ कचराकुंड्या ठेवू नयेत किंवा त्यांचे व्यवस्थापन वेळच्या वेळी करावे.

शाळा व्यवस्थापनांकडूनही संबंधित विभागांना याबाबत कळवण्यात आले असून, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कृती अद्याप झालेली नाही. दरम्यान, नगर परिषदेने याबाबत तत्काळ पावले उचलून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, याची हमी द्यावी, अशी मागणी आता जनतेकडून तीव्रतेने पुढे येत आहे.




# जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयातील लिफ्ट बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३० :** मडगाव येथील जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीतील लिफ्ट गेल्या काही दिवसांपासून बंद असून त्यामुळे रोजच्या कामासाठी येणाऱ्या नागरिकांना तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना गंभीर गैरसोय सहन करावी लागत आहे. विशेषतः जेष्ठ नागरिक, गर्भवती महिला आणि शारीरिक हालचालींमध्ये अडचण असलेल्या व्यक्तींना हे आव्हान अधिक तीव्रतेने भोगावे लागत आहे.

चार मजली इमारतीत जिल्हा पंचायत, समाज कल्याण विभाग, आदिवासी कल्याण, सामूहिक प्रशासन, महिला व बाल कल्याण, तसेच जिल्हा कृषी कार्यालय यांसारखी विविध सरकारी कार्यालये आहेत. त्यामुळे दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिक या इमारतीत ये-जा करतात. लिफ्ट ही सुविधा अशा ठिकाणी केवळ ऐच्छिक नसून अत्यावश्यक आहे, असे स्थानिकांचा ठाम मत आहे.

ही सरकारी इमारत असून येथे दररोज शेकडो नागरिक विविध शासकीय सेवांसाठी येतात. अशा ठिकाणी लिफ्ट बंद असणे हे धक्कादायक आहे. वृद्ध आणि गर्भवती महिलांना जिने चढण्यास भाग पाडले जाते, हे किती अन्यायकारक आहे ! अशी प्रतिक्रिया समाजकल्याण विभागाला भेट देणाऱ्या स्थानिक रहिवासी मिलाग्रेस फर्नांडिस यांनी दिली.




तिसऱ्या मजल्यावर चढणारे ज्येष्ठ नागरिक सदानंद नाईक म्हणाले की , माझे गुडघे साथ देत नाहीत. प्रत्येक पायरी ही वेदनादायक ठरते. काही वेळा श्वास घेण्यासाठी थांबावं लागतं. आपण सर्वसमावेशक प्रशासनाची भाषा करतो, पण याच प्रशासनानेच आम्हाला अशी त्रासदायक परिस्थिती सहन करायला लावली आहे.

एका विभागातील महिला कर्मचारी, नाव न छापण्याच्या अटीवर, म्हणाल्या, रोज ये-जा करताना हा चढ उतार आता नकोसा वाटतो. लिफ्ट नसल्यानं कामावर वेळेत पोहोचणं अवघड होतंय. अशा लोकाभिमुख इमारतींमध्ये प्राथमिक सुविधा कार्यरत असणं गरजेचं आहे.

लिफ्ट बंद असल्याच्या तक्रारी अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे पोहोचवण्यात आल्या आहेत, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. लिफ्टच्या दुरुस्तीबाबत प्रशासनाचा दिरंगाईपूर्ण दृष्टिकोन नागरिकांच्या रोषास कारणीभूत ठरत आहे. विशेष म्हणजे, पायऱ्या चढण्यात अडथळा असलेल्या नागरिकांसाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

या परिस्थितीमुळे सरकारी इमारतींच्या प्रवेशयोग्यता आणि सुरक्षा याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. नागरिकांनी आणि कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रार करूनही परिस्थिती जशीच्या तशी राहिल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. संबंधित विभागांनी तातडीने लक्ष घालून लिफ्टची दुरुस्ती करावी आणि भविष्यात अशा मूलभूत सुविधांची नियमित देखभाल सुनिश्चित करावी, अशी मागणी आता अधिक तीव्रतेने पुढे येत आहे.

# 'इन्व्हेस्ट गोवा २०२४'मधील अनियमिततेबाबत 'आप'ची चौकशीची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३० :** इन्व्हेस्ट गोवा २०२४ या उच्चस्तरीय गुंतवणूक शिखर परिषदेच्या आयोजनात नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांनी नमूद केलेल्या आर्थिक व प्रशासकीय अनियमिततांवर आम आदमी पक्षाने तीव्र प्रतिक्रिया दिली असून संबंधितांकडून जबाबदारी निश्चित करण्याची आणि स्वतंत्र चौकशीच्या नियुक्तीची मागणी केली आहे.

शनिवारी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात आप'चे गोवा राज्याचे उपाध्यक्ष आणि कुडतरी येथील नेते रॉक मस्करेन्हास यांनी या संपूर्ण प्रकरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी स्पष्ट केले की, कॅगचा अहवाल गंभीर स्वरूपाचा असून त्यातून केवळ आर्थिक शिस्तभंग नव्हे तर संस्थात्मक व्यवस्थेतील सखोल त्रुटी स्पष्ट झाल्या आहेत. हे चिंताजनक असून त्वरित संस्थात्मक आत्मपरीक्षणाची गरज आहे.

मस्करेन्हास यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, कार्यक्रमातील ऑपरेशनल जबाबदाऱ्या कार्यकारी अधिकारी आणि खरेदी अधिकाऱ्यांवर असल्या तरी अंतिम देखरेख आणि धोरणात्मक नियंत्रण गोवा औद्योगिक विकास महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष ॲलेक्स रेजिनाल्ड यांच्याकडे होते. तेच त्या काळात गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाचेही प्रमुख होते.

ही जबाबदारी टाळण्याची वेळ नाही. गोवा आयडीसीसारख्या संस्थांतील पारदर्शकता आणि सार्वजनिक निधीच्या वापराबाबत धोरणात्मक सुधारणा ह्या काळाची गरज आहे. ही वैयक्तिक दोषारोपांची नव्हे तर संस्थात्मक उत्तरदायित्वाची गोष्ट आहे, असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, जेव्हा सार्वजनिक निधी निष्काळजीपणे खर्च केला जातो, तेव्हा त्याचा थेट भार सामान्य नागरिकांवर येतो. त्यामुळे निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकता आणि जबाबदारी ही कोणत्याही लोकशाही व्यवस्थेची मूलभूत अट आहे.

या पार्श्वभूमीवर त्यांनी राज्य सरकारला इन्व्हेस्ट गोवा २०२४ परिषदेसंदर्भातील आर्थिक निर्णयांवर तातडीने स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी सुरू करण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे, कॅगने केलेल्या शिफारशींची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी आणि मानक प्रक्रिया डावलणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली.

आम आदमी पक्ष हा स्वच्छ, पारदर्शक आणि जनतेच्या हिताचे प्रशासन यासाठी वचनबद्ध आहे. आम्ही केवळ आरोप करत नाही, तर सुधारणेचा मार्ग सुचवत आहोत. शासनाच्या कोणत्याही त्रुटीमुळे जनतेचा विश्वास डळमळू नये, असेही मस्करेन्हास यांनी नमूद केले.

मस्करेन्हास यांच्या म्हणण्यानुसार, गोव्याचा विकास हा सार्वजनिक विश्वास आणि शिस्तबद्ध कार्यपद्धती यांना पायदळी तुडवून न होता, जबाबदार आणि पारदर्शक व्यवस्थेतूनच साध्य व्हायला हवा. गोवेकर प्रगतीस पात्र आहेत, पण ती अपारदर्शक व्यवहार आणि सार्वजनिक निधीच्या गैरव्यवस्थापनाच्या आधारावर नव्हे, असे ते म्हणाले.



# राष्ट्रीय डॉक्टर दिन विशेष



## वैद्यकीय सेवेतील निष्ठा आणि योगदानाला मानवंदना

**डॉक्टर हे समाजाचे आधारस्तंभ मानले जातात . आरोग्याच्या रक्षणासाठी अहोरात्र झटणारे, संकटसमयी देवदूतासारखे धावून येणारे. त्यांच्या अथक परिश्रमांचे स्मरण आणि सन्मान करण्यासाठी दरवर्षी १ जुलै रोजी राष्ट्रीय डॉक्टर दिन' साजरा केला जातो.**

राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा करण्यामागचा ऐतिहासिक संदर्भ पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री आणि देशातील थोर वैद्यकीय व्यक्तिमत्व डॉ. बिधान चंद्र रॉय यांच्या जन्मदिनी जोडलेला आहे. डॉ. रॉय यांचा जन्म १ जुलै १८८२ रोजी झाला आणि त्यांनी केवळ एक यशस्वी डॉक्टर म्हणूनच नव्हे, तर एक कुशल प्रशासक आणि सार्वजनिक आरोग्यसेवेचा द्रष्टा म्हणून देशासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून, भारत सरकारने १९९१ मध्ये १ जुलै हा दिवस राष्ट्रीय डॉक्टर दिन' म्हणून घोषित केला.डॉ. रॉय यांना त्यांच्या योगदानासाठी १९६१ मध्ये भारतरत्न' या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविण्यात आले होते. इंडियन मेडिकल असोसिएशन आणि मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान होते.

हा दिवस डॉक्टरांच्या निस्वार्थ सेवेला सलाम करण्याचा आणि आरोग्यसेवेतील त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचे स्मरण करण्याचा एक प्रयत्न आहे. यावेळी विविध वैद्यकीय परिषदांचे आयोजन, चर्चासत्रे, आरोग्य तपासणी शिबिरे आणि डॉक्टरांच्या गौरव समारंभांचे आयोजन करण्यात येते. हा दिवस समाजात आरोग्याबद्दल जागरूकता वाढवण्यासोबतच तरुणांना वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रेरणा देतो.साथीच्या रोगांच्या पार्श्वभूमीवर, नैसर्गिक आपत्ती किंवा इतर आरोग्य संकटांमध्ये डॉक्टरांनी बजावलेली भूमिका लक्षात घेतली, तर त्यांच्या सेवा केवळ व्यावसायिक न राहता, त्या सामाजिक बांधिलकीचा भाग बनतात. त्यामुळेच, डॉक्टर दिन हे केवळ एक औपचारिक उत्सव नसून, समाज-डॉक्टर यांच्यातील विश्वासाचे बंध दृढ करणारा दिवस ठरतो.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, भारतात सध्या १३.८६ लाख नोंदणीकृत ॲलोपॅथिक डॉक्टर कार्यरत आहेत. यासोबतच ७.५१ लाख आयुष प्रणालीचे नोंदणीकृत प्रॅक्टिशनर्स देशभर आरोग्य सेवा पुरवित आहेत. त्यामुळे सध्याचे डॉक्टर-लोकसंख्येचे प्रमाण १:८११ एवढे आहे. हे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेच्या मापदंडांच्या जवळ जाणारे असूनही, अजूनही ग्रामीण भागात डॉक्टरांची टंचाई जाणवते.सध्या भारतात १ लाख १८ हजार १९० एमबीबीएस जागा आणि ७४ हजार ३०६ पदव्युत्तर वैद्यकीय जागा उपलब्ध आहेत. याचा अर्थ वैद्यकीय शिक्षण व्यवस्था विस्तारत असली, तरी गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा सर्व स्तरांपर्यंत पोहोचवण्यासाठी अजूनही प्रयत्नांची आवश्यकता आहे.

राष्ट्रीय डॉक्टर दिन ही केवळ गौरवाची नव्हे तर चिंतनाचीही संधीअसते. आरोग्यसेवा हा व्यवसाय आहे की सेवेचा व्रत . यावर आजच्या नव्या पिढीतील डॉक्टरांनी




विचार करण्याची गरज आहे. कॉर्पोरेट रुग्णालयांची वाढती संख्या, उपचारांचा खर्च, वैद्यकीय सुविधा वाचवण्यासाठी असलेली स्पर्धा यामुळे डॉक्टर-रुग्ण यांच्यातील विश्वास दुरावल्याची भावना निर्माण होत आहे.

अशा पार्श्वभूमीवर, डॉक्टर दिनाची खरी प्रेरणा ही व्यावसायिक जबाबदारीबरोबरच मानवी मूल्यांची जपणूक करणारी ठरावी लागेल. डॉक्टरांचे कार्य हे केवळ आजार बरे करण्यापुरते मर्यादित नसून, ते संपूर्ण समाजाच्या आरोग्यविषयक समृद्धीशी जोडलेले असते.

यंदाच्या डॉक्टर दिनाची थीम ही केवळ आरोग्यसेवेच्या कार्यावर प्रकाश टाकणारी नाही, तर डॉक्टरांच्या अंतर्गत लढ्यांचे भान देणारी आहे.' बीहाईंड द मास्क, हू हिल्स द हिलर्स ?' अशी आहे. म्हणजेच, 'बरे करणाऱ्यांना कोण बरे करते ? ही थीम २०२५ मध्ये या दिवसाचे भावनिक वजन अधिक वाढवते.ही संकल्पना डॉक्टर आणि आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या मानसिक, भावनिक आणि व्यावसायिक दबावांवर प्रकाश टाकते. ताण, सततच्या जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा आणि व्यावसायिक निर्णयांच्या नैतिक गुंतागुंतीत अडकलेल्या आरोग्यसेवकांची माणूस म्हणून जाणीव करून देणारा हा विचार आहे.ही थीम समाजाला आवाहन करते की, आपण डॉक्टरांच्या केवळ कार्यकौशल्याचा गौरव न करता त्यांच्या मन:स्वास्थ्याकडेही लक्ष द्यावे. डॉक्टर देखील भावना असलेली, थकणारी आणि आधाराची गरज असलेली माणसे आहेत हे स्वीकारणे ही आजच्या काळाची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर अनेक रुग्णालये आणि वैद्यकीय संस्था हेल्प द हीलर, मेंटल वेलनेस फॉर मेडिकल्स यांसारख्या मोहिमांचे आयोजन करत आहेत. चर्चासत्रांमध्ये बर्नआउट, नैराश्य, कामाचा असंतुलित भार, आणि वैयक्तिक आयुष्यावरील परिणाम यावर खुली चर्चा होत आहे.

वाढती लोकसंख्या, बदलते आजारपण, वाढते आयुर्मान आणि तंत्रज्ञानातील क्रांती यांच्या पार्श्वभूमीवर, डॉक्टरांच्या जबाबदाऱ्या अविरत वाढत आहेत. या जबाबदाऱ्यांमध्ये फक्त वैद्यकीय निर्णय घेणेच नाही, तर रुग्णांच्या मानसिक स्थितीला समजून घेणे, त्यांच्या नातेसंबंधांचे बारकावे जाणून मार्गदर्शन करणे आणि अनेकदा संकटसमयी दिलासा देणे हेही आलं.डॉक्टर रुग्णांमध्ये केवळ आरोग्य सुधारणारे घटक नसून, विश्वास, आधार आणि आशा यांचे स्रोत बनतात.ही भूमिका बजावताना ते स्वतःच्या वेळेची, विश्रांतीची आणि कधी कधी वैयक्तिक भावनांचीही किंमत मोजतात.

आजच्या भारतातील आरोग्यसेवेचे परिदृश्य हे गंभीर असमानतेने पछाडलेले आहे. शहरी भागात तांत्रिक प्रगती आणि सोयी-सुविधांची रेलचेल असताना, ग्रामीण भारतात आजही प्राथमिक आरोग्यसेवा पुरविणे मोठे आव्हान आहे. अलीकडील अभ्यासानुसार, देशात डॉक्टर-लोकसंख्येचे प्रमाण सुमारे १:८११असले तरी, प्रत्यक्ष वितरणामध्ये प्रचंड तफावत दिसून येते.या विषमतेत, ग्रामीण वंचित भागात कार्यरत डॉक्टरांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते . मर्यादित संसाधने, उपकरणांचा अभाव, आणि रुग्णांचे बहुआयामी प्रश्न. तरीही हे डॉक्टर्स न डगमगता सेवा देत राहतात हेच खरे डॉक्टर दिनाचे सार आहे.

आजच्या काळात आरोग्यसेवेत एआय , टेलिमेडिसिन, रोबोटिक सर्जरी आणि डिजिटल आरोग्य नोंदी यासारखी साधने येत आहेत. यामुळे सेवा अधिक सक्षम होत असली, तरी डॉक्टरांसाठी ही नवीन कौशल्ये आत्मसात करणे, नव्या पद्धतींचा अवलंब करणे, यासाठी अतिरिक्त मानसिक आणि वेळेचा खर्च होत आहे.अशा वेळी डॉक्टरांसमोर ही चिंता असते की, या प्रगत यंत्रणांमध्ये मानवी सहवेदना हरवू नये. डॉक्टर-रुग्ण यांच्यातील संवाद, सहानुभूती आणि विश्वास यांची जागा कोणतीही टेक्नॉलॉजी घेऊ शकत नाही.

इंटरनेटवरील भरपूर आरोग्यविषयक माहितीमुळे, रुग्ण अधिक सजग परंतु कधी कधी गोंधळलेले आणि अवास्तव अपेक्षा ठेवणारे असतात. डॉक्टरांना केवळ उपचार देणे नव्हे, तर शिकवणे, योग्य माहिती देणे आणि संवादातून विश्वास तयार करणे हीही जबाबदारी पार पाडावी लागते. आजचा डॉक्टर उपचारकच नव्हे, तर शिक्षक, समुपदेशक आणि माणुसकीचा चेहरा बनून राहिला आहे.

डॉक्टरांचे कार्य केवळ हॉस्पिटलपर्यंत मर्यादित नाही. सार्वजनिक आरोग्य शिक्षण, आरोग्यविषयक जनजागृती मोहिमा, आणि साथीच्या आजारांविरोधातील प्रयत्नांत त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

डॉक्टर आरोग्यसेवा धोरणांचे शिल्पकारही आहेत. कोविड-१९ च्या काळात, डब्ल्यूएचओचे महासंचालक डॉ. टेड्रोस घेब्रेयसस यांनी जागतिक लसीकरणासाठी समानतेचा आग्रह धरला होता. हेच नेतृत्व डॉक्टर देशातही दाखवत आहेत . ग्रामीण भागात आरोग्यसेवा पोहोचवण्यासाठी काम करणाऱ्या संघटनांबरोबर ते हातात हात घालून काम करत आहेत.हे योगदान केवळ वैद्यकीय सेवा पुरवण्यापुरते मर्यादित नाही, तर आरोग्य समतेसाठी चळवळ निर्माण करणारे नेतृत्व आहे.

आज, राष्ट्रीय डॉक्टर दिन २०२५ च्या दिवशी, आपण डॉक्टरांकडे केवळ उपचार करणाऱ्यांच्या भूमिकेतून न पाहता, ते ज्या बहुआयामी सेवाभावाने आपले जीवन समर्पित करतात त्याचे ऋण मान्य करूया.

त्यांची लढाई ही केवळ आजारांविरुद्ध नाही, तर मानवी गरज, मानसिक थकवा, तांत्रिक संक्रमण, सामाजिक अपेक्षा आणि व्यवस्थात्मक विसंगतींविरुद्धही असते. तरीही ते झगडतात. माणुसकी जपण्यासाठी, आरोग्य सुधारण्यासाठी. आजचा दिवस त्यांच्या या अढळ वचनबद्धतेसाठी सलाम करण्याचा दिवस आहे.

